# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:maharashtra.cetcell@gmail.com


क्र.तंशिप्र-१२२१/प्र.क्र.२०/सीईटी/१५६८ दिनांक - २६/०९/२०२२.

प्रति,
संचालक,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
शिवाजीनगर, पुणे - ४११००५.

**विषय - B.Planning व M.Planning या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया समुपदेशनाने राबविण्याबाबत...**

संदर्भ - १. प्रवेश नियामक प्राधिकरण यांची बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०६/०५/२०२०
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२१/प्र.क्र.२०/सीईटी/१८४०, दिनांक ०२/११/२०२१.

उपरोक्त संदर्भाकींत विषयानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये B.Planning व M.Planning या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया आपल्या संस्थेमार्फत राबविण्याबाबत संदर्भ क्रमांक २ अन्वये आपणास कळविण्यात आलेले होती. त्यानुसार आपण प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडलेली असून त्याचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता B.Planning व M.Planning या अभ्याक्रमासाठी प्रवेशोच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणे, गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे आणि समुपदेशन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया करण्यासाठी संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांची प्रवेश प्रक्रिया अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण विभाग, पुणे हे निरीक्षक म्हणून काम पाहतील.

तसेच सदरील प्रवेश प्रक्रिया दिनांक २७/०९/२०२२ ते दिनांक ०७/११/२०२२ या कालावधीत पुर्ण करण्याचे संबंधीत महाविद्यालयांना आदेश देण्यात येतील. तसेच सदरील प्रक्रिया पार पाडल्यानंतर त्याचा अहवाल महाविद्यालयाकडून सहसंचालकांमार्फत होवून या कक्षास सादर करण्यात यावा.

**(महेन्द्र ब. वारभुवन) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत-
१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
३. सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण विभाग, पुणे